# श्रीलक्ष्मीपूजन विधी (पत्रक)

**(दिनांक ३० ऑक्टोबर २०१६)** श्री साई शक ३५

* **हे अनुष्ठान रविवार दि. ३० ऑक्टोबर २०१६ (आश्विन अमावस्येला) सायंकाळी ६.०५ ते ८.३५ यादरम्यान मांडून खालीलप्रमाणे पूजन विधी करावा.**
* लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी अमावास्येचे वेगळे अनुष्ठान मांडणे आवश्यक नाही.

---

**साहित्य :**

नित्यपूजन विधी साहित्य + गोमूत्र (किंवा हळद-कुंकू घातलेले पाणी), रांगोळी, पाट, अक्षता, पंचामृत, विडा (२ पाने व १ सुपारी), रु. ११/- दक्षिणा, एक श्रीफळ, एक फळ, एक वाटी गूळ-खोबरे, धने-गूळ व लाह्या-बत्तासे (ऐच्छिक) आंब्याच्या पानांचे तोरण व आंब्याची डहाळी.

**पूजनविधी :**

१) • सर्वप्रथम एका भांड्यात पाणी घेऊन त्यात गोमूत्र किंवा हळद-कुंकू घालावे. हे पाणी आंब्याच्या किंवा विड्याच्या तीन पानांनी घरात सर्वत्र शिंपडावे.
- दरवाज्यावर आंब्याच्या पानांचे तोरण बांधून मधोमध आंब्याची डहाळी लावावी. तसेच, दरवाजाबाहेर उंबरठ्यावर रांगोळी काढावी.

२) खालील प्रार्थना करून पूजनविधीस प्रारंभ करावा.

**प्रार्थना : 'गुरुआज्ञेने मी माझ्या कुटुंबातील कुलधर्म भावी काळासाठी निश्चित केला असून जी सेवा माझ्या हातून घडेल, ती आपण सर्व देवदेवतांनी मान्य करून घ्यावी.'**

३) • पूजनाची जागा गोमूत्र किंवा पंचामृताने शुद्ध करून घ्यावी.
- हळद-कुंकवाचे स्वस्तिक काढून त्यावर पाट मांडावा.
- पाटाभोवती रांगोळी काढून त्यावर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व काढावे व त्यावर ताम्हन ठेवावे.
- ताम्हनामध्ये अक्षता घालून त्यावर हळद-कुंकवाचे पृथ्वीतत्त्व काढावे.

४) • गुरुकृपेने प्राप्त झालेल्या श्रीसाईशक, श्रीकारण, श्रीमहाकारण व श्रीनारायणी या प्रतिमांना पंचामृत व त्यानंतर कोमट पाण्याने स्नान घालून स्वच्छ पुसून घ्याव्यात.
- त्यांपैकी श्रीसाईशक, श्रीकारण व श्रीमहाकारण या प्रतिमा डबीत घालून, ती डबी झाकण न लावता, अक्षतांवर काढलेल्या पृथ्वीतत्त्वावर, ताम्हनात ठेवावी. तसेच, श्रीनारायणी प्रतिमाही आसनासहित त्या डबीशेजारी, ताम्हनात ठेवावी.
- अनुष्ठानासमोर एक श्रीफळ, रु. ११/-चा विडा, गूळ-खोबरे, एक फळ, ठेवावे. विडा व श्रीफळावर हळद-कुंकू वाहावे.
- फूलास गंध, हळद-कुंकू लावून ती प्रतिमांवर वाहावीत.

५) • शेजारी एका पाटावर बँकेचे पुस्तक, एक नवीन कोरी वही, एक लाल पेन ठेवावे.
- त्या वहीच्या पहिल्या पानावर लाल पेनने खालीलप्रमाणे देवदेवतांची नावे लिहावीत. त्याखाली हळद-कुंकू ओले करून स्वस्तिक काढावे व शेवटी **'शुभम् भवतु'** असे लिहावे.

॥ श्री गणेशाय नमः ॥
॥ श्री महालक्ष्मी प्रसन्न ॥
॥ श्री महासरस्वती प्रसन्न ॥
॥ श्री महाकाली प्रसन्न ॥
॥ श्री नवनाथ प्रसन्न ॥
॥ परमपूज्य विभूती प्रसन्न ॥
॥ ॐ श्रीसाईनाथाय नमः ॥
॥ ॐ श्रीसद्गुरुनाथ दादाय नमः ॥
॥ श्री कुलदेवता प्रसन्न ॥
॥ श्री वास्तूदेवता प्रसन्न ॥
॥ श्री ग्रामदेवता प्रसन्न ॥

卐 ॥

६) • नंतर उदबत्ती, साजूक तुपाचे निरांजन व दूध-साखरेचा नैवेद्य दाखवावा. त्याचबरोबर धने-गूळ व लाह्या-बत्तासे यांचाही नैवेद्य दाखवावा (ऐच्छिक).

• कमीतकमी एक आरती म्हणावी. त्यानंतर **मंगलाचरण** (सजयति), **श्रीशक्तिपीठ प्रार्थना** म्हणावी. **एकवीस वेळा महामंत्र** (सर्व मंगल मांगल्ये) **एकवीस वेळा तारकमंत्र** (ॐ श्री सदगुरूनाथ दादाय नमः) म्हणावा. शेवटी **दैनंदिन प्रार्थना** म्हणावी.

**टीप :** • गूळ-खोबरे, धने-गूळ, लाह्या-बत्तासे व फळ हे त्याच दिवशी प्रसाद म्हणून घरात घ्यावे.

• वर दिलेली देवांची नावे वहीत लिहून वही पूजनापूर्वी तयार ठेवावी.

**७) लक्ष्मीपूजनाच्या दुसऱ्या दिवशी :**

• अनुष्ठान हलवावे व प्रतिमा धुऊन-पुसून पूर्ववत पूजनात ठेवाव्यात.

• ठेवलेला नारळ व ताम्हनातील अक्षता प्रसाद म्हणून घरात वापरात घ्याव्यात.

• रु. ११/-चा विडा, कार्यकेंद्रावर नेऊन प.पू. बाबांच्या चरणी, तबकात अर्पण करावा.

**सूचना : ज्यांच्याकडे प्रतिमा नसतील त्यांनाही श्रीलक्ष्मीपूजन वरीलप्रमाणेच करता येईल. फक्त प्रतिमांचे अनुष्ठान व त्याप्रीत्यर्थचे सर्व उपचार करू नयेत.**

**।। शुभं भवतु।।**